Prof. Dr. Shriniwas Hemade, madshri@otmail.com, 09226563052, ttp://shriniwashemade.yolasite.com/



### अभ्यासक्रम




1. सौंदर्यशास्त्र : तत्त्वज्ञानाची एक शाखा
2. सौंदर्याचे स्वरूप
3. कलेचे स्वरूप
4. कला आणि नैतिकता

# Unit 7
# Ethics (Indian)
# घटक ७
# सौंदर्यमीमांसा

---

(सौंदर्यमीमांसेचे स्वरूप आणि समस्या)

**प्रस्तावना :**

सौंदर्यशास्त्र ही 'सुंदर/ सौंदर्य ' या संकल्पनेचा तात्त्विक दृष्टिकोनातुन सिध्दान्त व प्रत्यक्ष व्यवहार या दोन्ही पातळीवर अभ्यास करणारी तत्त्वज्ञानाची शाखा आहे. म्हणजेच सौंदर्यशास्त्र ही 'सौंदर्यविषयक विविध सिध्दान्तांचा अभ्यास करणारी तत्त्वज्ञानाची शाखा असून सौंदर्यशास्त्रास 'कलेचे तत्त्वज्ञान ' (Philosophy of Art) असेही नाव आहे. अर्थात सौंदर्यशास्त्र आणि 'कलेचे तत्त्वज्ञान' हे दोन्ही शब्द एकाच व्यापक अर्थाने वापरले जातात. सौंदर्य आणि कला यांचा अभ्यास करणे म्हणजे सौंदर्यशास्त्राचा अभ्यास करणे होय.

सौंदर्यशास्त्राच्या मुख्य दोन परंपरा सांगता येतील :

- **ग्रीक - पाश्चात्य**
- **भारतीय सौंदर्यशास्त्र .**

## सौंदर्यशास्त्राचा इतिहासः

Aesthetics हा ग्रीक भाषेतील aesthesis किंवा aesthanomai या ग्रीक शब्दांपासून अलेक्झांडर बाऊमगार्टन (1714 - 62) या जर्मन तत्वज्ञाने 1735 साली त्याच्या Reflection on Poetry या पुस्तकातील एका विभागाला नाव देण्यासाठी बनविला.या दोन्ही शब्दांचा अर्थ 'इंद्रियांमार्फत मिळणाऱ्या संवेदना ' असा होतो.(aesthetikos असा ही आणखी एक शब्द आहे.) Aesthetics हा शब्द *Æsthetik* (A ला E जोडला जातो.) असा लिहिला जात असे, त्याचे आधुनिक स्पेलिंग *Ästhetik* असे केले जाते.नंतर सुलभीकरण म्हणून Aesthetics असे केले गेले. बाऊमगार्टनने व काही दूरस्थ अर्थाने काण्ट , हेगेल आणि त्यांच्या अनुयायी तत्त्वज्ञांनी या अभ्यासाला स्वतंत्र विद्याशाखेचा दर्जा प्राप्त करुन दिला.अर्थात जॉन लॉक (1632 - 1704) या ब्रिटीश अनुभववादी तत्त्वज्ञाचा मित्र शाफ्टस्बरीने (1671 - 1713 ) Aesthetics चा खरा पाया रचला, असे म्हंटले जाते.त्याने सौंदर्य आणि नीती यांच्या परस्परसंबंधाचे अतिशय गंभीर चिंतन केले.त्यानंतर Aesthetics म्हणजे सौदर्यशास्त्र , असा अर्थ रुढ झाला.

## भारतीय सौंदर्यशास्त्र

भारतीय सौंदर्यशास्त्राचे स्वरुप थोडक्यात का होईना पण स्पष्ट करण्याची गरज आहे .कारण त्याविषयी एकतर अज्ञान असते किंवा गैरसमजच जास्त आहेत.मुळात ते 'सौंदर्यशास्त्र' या नावाने ते विकसित झालेले नसून '**संस्कृत साहित्यशास्त्र** ' या नावाने ते अतिपरिचित आहे.प्रारंभापासून एकेका विशिष्ट कलेच्या परिशीलनाशी ते निगडीत आहे.भारतीय परंपरेत ज्या कला निर्माण झाल्या त्या प्रत्येक कलेचा **प्रवर्तक** मानला जाणारा एक ऋषि - मुनी असतो.त्या कलेचे रुपदर्शन घडविणारा एक **सूत्रग्रंथ** असतो. सूत्रग्रंथाचा अर्थ स्पष्ट करणारे पुस्तक लिहिले जाते, ते लिहिणारा तो

टीकाकार असतो. त्यापुढची कलेची विकासपरंपरा, तिचे आचार्य आणि व्याख्या, टीकाकार यांच्या एकूण कुलप्रणालीचा उल्लेख टीकाकार करीत असतो. टीकाकार केवळ सूत्रग्रंथाचा अर्थ स्पष्ट करणारी टीका न लिहीता त्याची स्वतःची भूमिकाही मांडतो.ती त्याची स्वतंत्र कृती असते,पण तो ''ही आपली स्वतंत्र कृती आहे '', असे न सांगता बीजरुपाने ती मूळ सूत्रांतच सामावलेली आहे , असे सांगतो.

भारतीय सौंदर्यशास्त्र कलामीमांसा आणि साहित्यमीमांसा अशा दोन्ही कृती करते. शब्दार्थ विचार , अलंकार , रीति,ध्वनि,वक्रोक्ति , रस या मुख्य संकल्पना असून भरत (इ.स.पू.पहिले शतक ) ते जगन्नाथ पंडित (सतरावे शतक ) असा व्यापक पट भारतीय सौंदर्यशास्त्रास लाभलेला आहे.

भारतीय सौंदर्यशास्त्र [1] हे मूलतः वैदिक परंपरेवर आधारलेले असल्याने त्यात बौध्द व जैन धर्म आणि दर्शने यांच्यातील सौंदर्यविचारांचा त्यात समावेश नाही.प्राचीन भारतीय मीमांसेत अभिजात संस्कृतीमध्ये उत्पन्न झालेली आणि संस्कृतमध्ये ग्रथित झालेली मीमांसाच येते.अन्य सांस्कृतिक उपप्रवाहांची मीमांसा त्यात अभिप्रेत नाही. अर्थातच ही भूमिका योग्य नाही.आपली (साहित्य) जिज्ञासा संस्कृतच्या शिवेपाशीच खुंटणे हे काही बरे नाही, असे मत प्रसिद्ध विचारवंत अशोक केळकर यांनी व्यक्त केले आहे.

## 1. सौंदर्यशास्त्र : तत्त्वज्ञानाची एक शाखा

आज सौंदर्यशास्त्र ही तत्त्वज्ञानाची स्वतंत्र शाखा म्हणून ओळखली जाते.ती मुख्यतः कला आणि ज्यात सौंदर्यानुभव आणि सौंदर्यमूल्यांचा संबंध येतो, अशा परिस्थितीचा अभ्यास करते. याचाच अर्थ, एक : **कलेची तत्त्वमीमांसा** आणि दोन : **सौंदर्यात्मक प्रतिक्रिया व सौंदर्यविधानांचे विश्लेषण,** अशा दोन गोष्टींचा समावेश सौंदर्यशास्त्रात होतो.कलामीमांसा व सौंदर्यमीमांसा याची बऱ्याचदा सरमिसळ होते इतके त्यांच्यात साम्य आहे.

सौंदर्यशास्त्रातील मूलभूत प्रश्न म्हणजे : कलाकृती किंवा नैसर्गिक दृश्य पाहाताना आपण ज्या अभिवृतीने प्रेरित होवून पाहातो ती विशेष अशी सौंदर्यात्मक अभिवृती म्हणजे काय ? सौंदर्यात्मक अनुभव म्हणजे नेमका कोणता अनुभव ? या अनुभवाच्या वर्णनाची परिभाषा कोणती ? तिचे स्वरुप काय ? त्याचे निकष कोणते ? सौंदर्यात्मक वस्तू म्हणजे नेमकी कोणत्या स्वरुपाची वस्तू ? सौंदर्यमूल्य म्हणजे नेमके कोणते मूल्य ? इत्यादी .

कलेच्या तत्त्वमीमांसेतील मुख्य प्रश्न म्हणजे 'कलेची व्याख्या' कशी करावी ? कलास्वादाचे किंवा रसग्रहणाचे काही नियम असतात का ? कोणती वस्तू कला आहे, याचे निकष कोणते ? कलेचे स्वरुप स्थलकालसापेक्ष असते की निरपेक्ष ? कला व नीति , कला व धर्म यांचा काही संबंध असतो का ? यांचा अभ्यास कलेचे तत्त्वज्ञान करते.

## सौंदर्याचे प्रकार :

साधारणतः सौंदर्य दोन प्रकारचे मानले जाते.

(1) निसर्ग सौंदर्य
(2) मानव निर्मित सौंदर्य - कला वस्तू आणि त्यातील कलात्मकता

सौंदर्याच्या जाणिवेतूनच साहित्य, संगीत, काव्य, कला यांची निर्मिती होती. मानवी कलाकृतींप्रमाणेच निसर्गही सुंदर असतो निसर्गाचे अनेक अविष्कार सुंदर, सुखद व उदात्त वाटतात. व्यक्तीच्या किंवा निसर्गाच्या सौंदर्याचा आपण अनुभव घेतो. पण सौंदर्यानुभव म्हणजे काय ? असा प्रश्न निर्माण होतो. त्यासंबंधी विविध सिध्दांत मांडण्यात आलेले आहे. त्या सिंध्दांताचा अभ्यास म्हणजे सौंदर्यशास्त्र.

---

[1]भारतीय विचारविश्वात १९८० पासून आणखी एका नव्या सौंदर्यशास्त्राची भर पडली आहे. ते म्हणजे दलित सौंदर्यशास्त्र.त्याची माहिती अशी: ब्राह्मणी सौंदर्यशास्त्र वर्णजातिस्त्रीदास्यावर व संस्कृत साहित्यावर आधारलेले आहे तर आजचे मराठी साहित्याचे सौंदर्यशास्त्र या ब्राह्मणी सौंदर्यशास्त्रावर पाश्चात्य सौंदर्यशास्त्राचे कलम करुन बनलेले आहे.त्यानुसार ते '**दलित जाणीव** ' आपल्या परिप्रेक्ष्यातून साफ वगळते.याचा अर्थ असा की वैदिक वर्णव्यवस्थेने जी स्वजाणीव विकसित केली तिच्यातून स्त्रिया आणि शूद्र - आदिवासी जमाती वगळल्या.त्यांच्या जाणिवेचा परिघ तिथपर्यंत विस्तारला नाही.ज्या जगाची निर्मिती त्यांनी केली त्यातून एक मुख्य प्रवाहचे अस्तित्वच नाकारुन जनसंवादच खोडला.त्यामुळे वैदिक जगाची रचना पक्षपाती ठरते.एवढेच नव्हे तर ' मानवनिर्मित पुरुषतंत्री जग अस्तित्वातच नाही , अशीही मांडणी ते करतात.तर दुसऱ्या बाजूला अख्खे तत्त्वज्ञान निर्माण करुन अस्तित्व, ज्ञान,विचारप्रक्रिया, नीति व सौंदर्य या मुख्य तात्विक बाबतीत सूक्ष्म हिंसेचे युध्द खेळून ते जिकंत राहतात.

सौंदर्य शास्त्रात दोन प्रकारचे प्रश्न उपस्थित होतात.

*(1) कोणत्या गोष्टी सुंदर आहे ? कोणत्या गुंणांमुळे त्या सुंदर ठरतात ? सौंदर्याचे निकष कोणते ?*

*(2) सौंदर्य या संकल्पनेची तार्कीक वैशिष्टये कोणती ? सौंदर्य विधानांचे स्वरुप काय ?*

## 2. सौंदर्याचे स्वरूप

सौंदर्य ही तात्त्विक संकल्पना आहे. याबाबत दोन भूमिका आहेत. पहिली वस्तुनिष्ठ आणि दुसरी व्यक्तीनिष्ठ. या भूमिकांमध्ये प्राचीन काळापासून वाद आहेत. वस्तुनिष्ठ भूमिका घेणाऱ्यांच्या मते सौंदर्य हा सौंदर्यात्मक घटक अनुभव घेणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून नाही; तर संबंधित सौंदर्यवस्तूच्या इतर गुणधर्माशी तुलना करून अथवा त्या गुणधर्मात सौंदर्याची व्याख्या करता येते. उदाहरणार्थ ताजमहाल सुंदर आहे, असे म्हणताना त्याचा दगड, गुळगुळीत स्पर्श, त्याची किंमत, त्याचे दिसणे या गुणधर्मामुळे ताजमहाल सुंदर आहे, असे म्हणता येते. कांटने ही भूमिका मांडली. त्याच्या मते सौंदर्याचा अनुभव हा मानवी हेतूनी युक्त नसतो. सुंदर वस्तू मालकीची असावी, उपभोगास मिळावी इत्यादी हेतू नसतात. 'हेतुरहित असणे ' हाच हेतू असतो.

व्यक्तीनिष्ठ भूमिका घेणाऱ्यांच्या मते सौंदर्याची व्याख्या अशी करता येत नाही. "काय सुंदर वाटेल ? " हे दोन गोष्टीवर अवलंबून असते. पहिली बाब म्हणजे, एखादी वस्तू सुंदर आहे कि नाही, हे त्या व्यक्तीवरच अवलंबून असते. सौंदर्याचा अनुभव ही व्यक्तिगत बाब आहे. व्यक्तीला येणाऱ्या खासगी अनुभवावर सौंदर्य अवलंबून असते. दुसरी बाब म्हणजे त्या वस्तुवरही ते अवलंबून असते.जर सौंदर्यवस्तू सुखदायी असेल तर ती सुंदर वाटते अन्यथा नाही. शिवाय अनुभव घेणाऱ्या माणसाची मानसिक अवस्था, त्याची आर्थिक स्थिती, शिक्षण, जीवन विषयक मत या घटकांचाही प्रभाव पडतो. प्राचीन ग्रीक काळात सोफीस्ट तत्त्ववेत्यांनी आणि १८ व्या शतकात डेविड ह्युमने हि भूमिका मांडली.

## सौंदर्यवस्तू :

सौंदर्यवस्तू ही कोणत्यातरी द्रव्याची बनलेली असते. त्या द्रव्यास कोणता तरी रंग असतो. म्हणून ते दिसते. त्या द्रव्याला काही आकार असतो. त्या आकारामध्ये काही योजना असतात. त्यामुळे त्या आकाराला एक विविष्ट स्वरुप मर्यादा रेषांनी प्राप्त होते. द्रव्य, रुप, आकार, संयोजन, रेषा इ. तेव्हा सामान्यपणे हे प्राथमिक घटक होय. या प्राथमिक घटकांचे परस्परांशी संबंध असतात. त्यातूनच द्वितीय कक्षेमधील सौंदर्यधर्म तयार होतात. या घटकांची परस्परांशी संगती, सुसंवादीपणा, प्रमाणबध्दता हे सौंदर्याचे महत्वाचे घटक आहेत. परंतु मूळ प्राथमिक घटकांशिवाय त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाही. एकरुपता, विविधता, विरोध, संगती, प्रमाणबध्दता, समतोलत्व हे या प्रकारचे सौंदर्यधर्म होय. सौंदर्याचे आणखीही काही गुण मानण्यात येतात. सौंदर्य स्वार्थनिरपेक्ष असते. तसेच त्यामध्ये काही सूचकता असते व एक प्रकारची गूढ रम्यता सुध्दा असते.साधेपणा, संयम यांची योग्यता मांडणी असते. हे गुण दृष्टिवर म्हणण्यापेक्षा बुध्दीगोचर म्हणणे योग्य ठरते

## सौंदर्य शास्त्रातील विधाने

सौंदर्य विधाने, कलाकृती व इतर सुंदर वस्तू यांच्या बद्दल असतात. सौंदर्यशास्त्रातील विधाने सौंदर्यविधानांब- ल असतात. सुंदर वस्तू यांच्याबद्दल असतात. सुंदर या शब्दाने एखादया गुणधर्माचा निर्देश होतो का ? असल्यास हा गुण कोणत्या जातीतला आहे. तो व्याख्येय आहे का ? त्याचे निकष देता येतात का ? इ. प्रश्न सौंदर्यशास्त्रीय प्रश्न आहे. कारण ते समिक्षात्मक विधानांच्या व त्यात वापरल्या गेलेल्या संकल्पनांच्या तार्कीक स्वरुपाविषयीचे प्रश्न आहे. समिश्र व्यवहारात वापरल्या गेलेल्या संकल्पनांचे तार्कीक विश्लेषण करणे हे सौंदर्य शास्त्राचे एक प्रमुख कार्य आहे.

## सौंदर्यशास्त्रविषयक नवे गैरसमज

विसाव्या शतकाच्या अखेरिस भाषाशास्त्र, साहित्यशास्त्र, कलाशास्त्र,मूल्यशास्त्रे विकसित झाली.त्यातच ललित कला, सिनेमा,छायाचित्रण, व्हीडीओ,सादरीकरण कला , एवढेच काय पण इलेक्ट्रॉनिक व संगणकीय कलांचा विकास झाला. परिणामी अनेक स्वयंघोषित क्षेत्रियतज्ञ बेधडकपणे सौंदर्यशास्त्रावर (चिंताजनक) चिंतन व्यक्त करु लागले.त्यातच उच्चशिक्षणाच्या पातळीवर नाट्यकला ही वेगळी स्वतंत्र ज्ञानशाखा झाल्यामुळे तर नाट्यकर्मी व सहायकारी रंगकर्मी तर अतिउत्साही झाले.त्यांच्याकडूनही Aesthetics बद्दल मुक्त चिंतनाला उधाण आले.सौंदर्यशास्त्र व भाषासमीक्षा यांचाही

तोंडवळा सारखा आहे.त्यामुळे एक चमत्कारीक परिणाम असा झाला की तत्त्वचिंतकापेक्षा साहित्यिक व भाषेचे अभ्यासक (आणि मुरलेले पट्टीचे प्राध्यापक )सौंदर्यशास्त्रावर हक्क सांगू लागले.

सौंदर्यशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी किंवा ते शिकविण्यासाठी अभ्यासकाला काही एक साहित्याचे ,समीक्षेचे ज्ञान असणे गरजेचे असतेच.पण त्याच बरोबर वस्तुनिष्ठ निःपक्ष संकल्पनात्मक चिकित्सेसाठी तत्त्वज्ञानाचे ही ज्ञान असणे अनिवार्य असते.(याचा अर्थ असा नव्हे की तत्त्वचिंतकानेच ही चिकित्सा करावी ! )

सौंदर्यशास्त्राची चिकित्सा हा खास तत्त्वज्ञानाचा अभ्यासविषय असून ज्या कोणाही व्यक्तिस ती करावयाची आहे त्या व्यक्तिस मात्र तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणे , त्यात काहीएक प्रशिक्षण घेणे अटळ असते, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.कारण ती चिकित्सेचीही चिकित्सा आहे.शिवाय भारतीय सौंदर्यशास्त्राच्या संदर्भात तरी साहित्यास्वाद,साहित्यसमीक्षा, साहित्यमीमांसा यात फरक आहे.



या गदारोळात 'सौंदर्य ' ही एक तात्त्विक संकल्पना असून तिची चिकित्सा तात्त्विक पातळीवरच करावी लागते, याचे भानच उरले नाही.त्याचा विनोदी परिणाम इंटरनेटवर दिसतो. Aesthetics, Aesthetician , Beauty, Beautician असे शब्द शोधयंत्राला दिले की तो नेलपॉलिश,विविध तेले,सुगंध , पावडरी,चेहऱ्याला लावण्याचे रंग,पेहराव, विविध फॅशनी इत्यादीच्या ' सौंदर्यप्रसाधनांची जागा' दाखवतो.म्हणजे एका अर्थाने ते यंत्र 'सौंदर्यशास्त्राची जागा' दाखविते.ज्याची आपण आता चर्चा करीत आहोत ते मूल्यात्मक सौंदर्यशास्त्र शोधावयाचे असेल तर आधी Philosophy च्याच जोडणीवर जावे लागते ! मग तेथून तत्त्वज्ञानाची एक शाखा म्हणून सौंदर्यशास्त्राची उपजोडणी आणि इतर जोडण्या मिळत राहातात.सौंदर्यशास्त्राचे स्वरुप अशा रितीने प्रारंभापासूनच गडबडीचे राहिले आहे.

याचाच एक भाग म्हणून की काय समाजात जी काही तथाकथित 'Beauty Parlors' निघाली आहेत तिचे चालक मालक किंवा मालकीणी स्वतःला 'सौंदर्यशास्त्रज्ञा'[2] समजत असतात,त्याप्रमाणे भाषणे ठोकणे , लेखन करणे अशी गैरसमज पसरविणारी कामे करीत असतात.

### 3. कलेचे स्वरूप

सौंदर्य शास्त्र ज्या गोष्टीची चर्चा करते, ती कला होय. कला , कलाकार, व कलावस्तू यांचा अभ्यास या शाखेत होतो. कला निर्मितीमागे कलाकाराची प्रेरणा असते. **'कला'** हा शब्द संस्कृतमध्ये निरनिराळया अर्थाने वापरला जाते. कला म्हणजे अंश. उदा. चंद्रकला. कला म्हणजे संपूर्ण जीवन नसून जीवन अंश. आज आपण ज्यांना कला म्हणतो त्यात प्रत्येकी जीवनातील काही अंगच प्रतिबिंबीत झालेले दिसतात. म्हणून ही कदाचित जीवन अंगाच्या पूर्नदर्शनाचे कला असे नामकरण झालेले असावे. कला या शब्दाचे ज्ञान आधि ध्वनी असेही अर्थ आहे.

**'कला'** या शब्दाने आपणास जे अभिप्रेत होते त्याची पर्ण व्याख्या करणे कठण आहे. पण गीत, वादय, संगीत, साहित्य, चित्र, शिल्प, वास्तू, नृत्य, नाटय, संगीत, साहित्य, चित्र शिल्प वास्तू, नृत्य नाटय इ. शब्दांनी आपणाला जो अनुभव येतो त्या अनुभव विशेषंना कला विशेष म्हणता येईल. त्याचप्रमाणे अशा कला विशेषांच्या कुटुंबास कला असे म्हणता येईल.

नृत्य, संगीत, काव्य, चित्र, नाटय इ. कलांच्या स्वरुपाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास एक गोष्ट निश्‍चितपणे समोर येते ती म्हणजे ही या सर्व कला म्हणजे जणू काही निर्माता आणि रसिक यांच्यामध्ये चाचलेला खेळ होय. एका खेळाडूने तो स्विकारावा त्याचप्रमाणे निर्माता जणुकाही हे आपल्या जवळचे काहीतरी दूर सारतो हा दुसरा कोणीतरी रसिक त्या काही तरी जवळ करतो. कोणत्याही कलेला ढोबळमानाने खालील गोष्टी लागतात.

(1) निर्माता
(2) रसिक
(3) निर्मात्याने निर्माण केलेली वस्तू

[2] सौंदर्यशास्त्र तज्ञ' नव्हे ! खरे तर 'सौंदर्यशास्त्रज्ञा' व सौंदर्यशास्त्र तज्ञ' या दोन विषेशणांपैकी नेमके कोणते स्वतःसाठी वापरावे, हे ही त्यांना समजत नसते.

(4) या वस्तूंचे निर्मात्यापासून तर रसिकापर्यंत झालेले भ्रमण अथवा व्यापार

नदीचा नदी म्हणून उच्चार होण्यापूर्वी ती ज्याप्रमाणे सरोवर रुपाने, सरोवराच्या अंशरुपाने किंवा मेघाच्या रुपाने अस्तित्वात असली पाहिजे. आणि सुद्रात विलीन झाल्यानंतर सुध्दा समुद्र रुपाने अस्तित्वात असली पाहिजे. आणि समुद्रात विलीन झाल्यानंतर सुध्दा समुद्र रुपाने अस्तित्वात असली पाहिजे. त्याचप्रमाणे कला ही प्रथम निर्मात्याच्या मनात आणि नंतर रसिकाच्या मनात आणि नंतर रसिकाच्या मनात मनोरुपाने अस्तित्वात असली पहिजे. ज्याप्रमाणे नदी ही केवळ मधल्या अवस्थेत नदी या व्यक्त रुपाने अस्तित्वात राहते. त्याचप्रमाणे मधल्या अवस्थेतच कला ही कोणत्या तरी रुपाने व्यक्त रुपात असते. स्वरुपात अस्तित्वात असत.



कला या खेळासारख्या असतात. कलेत निर्मात्याला काहीतरी संदेश पाठवायचा असतो. निवेदन करावयाचे असते. कला माध्यम हे या संदेशवाहकाचे काम करते. कलेचे हे कार्य खेळाशी किंवा भाषेशी बरेच जुळते आहे. म्हणून एका दृष्टिने कला ही भाषा प्रकार किंवा खेळाचा प्रकार आहे असे म्हटले तरी चालेल. अर्थात कला,भाषा व खेळात काहीच फरक नसतो असे मात्र म्हणता येणार नाही.

कला म्हणजे अभिव्यक्ती होय. व्यापक अर्थाने कला हा व्यापार आहे हा व्यापार तीन अवस्थांमधून होतो. प्रथम ती मानसिक असते व निर्मात्याच्या मनात असते. हीच अवस्था दुसऱ्या अवस्थेत वस्तूरुपात अभिव्यक्त होते. आणि हीच वस्तू पुन्हा आस्वाद किंवा ज्ञानरुपाने रसिकाला ज्ञात होते. या तीन अवस्थांचे एकच वस्तू म्हणून कधीतरी वर्णन केले जाऊ शकते. कारण त्यातला अर्थ संदेश एकच असतो. परंतु कालमर्यादा व स्वरुप मर्यादा असल्यामुळे या तीन अवस्थांचे वेगळेपणही मान्य करावे लागते. मर्यादित अर्थाने या तीन अवस्थांपैकी अभिव्यक्त वस्तूरुप माध्यम अवस्था हीच ' कला ' होय.

**कला म्हणजे आविष्कार : कॉलिंगवूड**

कलेविषयीचा सिध्दांत कॉलीगवूडने आपल्या "Principals of Art" या ग्रंथामध्ये मांडला आहे. कला हा शब्द कार्यवाचक आहे.महणजे तो कोणतीतरी कृती करणे आवश्यक आहे, असे सुचवितो.त्यामुळे कलेची चर्चा करणाऱ्या कलामीमांसाशास्त्राला अभिप्रेत असलेला नेमका अर्थ कलाविषयक इतर अफवांपासून वेगळा काढणे, जरुरीचे आहे,असे कॉलींगवूडचे म्हणणे आहे.त्याचे म्हणणे तो पुढीलप्रमाणे मांडतो :

" 'कला म्हणजे काय ?' हे कळण्यासाठी कला म्हणजे काय नाही , हे कळणे आवश्यक आहे .कला म्हणजे ज्याचे तंत्र शिकता व शिकवता येते असा हस्त व्यवसाय किंवा कारागिरी नव्हे. कला म्हणजे वास्तवाची प्रतिकृती नव्हे आपल्या व्यवहारात उपयुक्त ठरतील अशा वेगवेगळया भावनांची जागृती करण्याचे किंवा मनोरंजन करण्याचे साधन म्हणजे कला नव्हे.कलेची दोन लक्षणे असतात."

(1) आविष्कार

(2) कल्पना.

कॉलींगवुडच्या मते व्यक्तिचा भाव (Feeling) हा अनुभव प्रकार व विचार यांच्यात काही भेद आहेत. त्या आधारवर आपण कल्पना व आविष्कार ही लक्षणे सांगू शकतो. भाव व विचारातील फरक पुढील प्रमाणेः

1) विचारात द्विधृवात्मकता - दोन विरूध्द विचार असू शकतात. (दोन ध्रुव) विचार करण्याची प्रक्रिया यशस्वी होते किंवा अयशस्वी होते. तिला सत्य सापडते किंवा सापडत नाही. 'भाव' मध्ये द्विधृवात्मक नसते. कारण भाव व्यक्तिगत असतात.
2) विचार सर्वमान्यतेचा दावा करतो. 'भाव' व्यक्तीसापेक्षच राहते. आज तापमान 112 अंश आहे,हा विचार जसा एका व्यक्तीला खरा तसा तो सर्वांनाच खरा असतो. पण मला आज फार गरम वाटते आहे. हे विधान 'भाव' बद्दलचे म्हणजे व्यक्तीसापेक्ष आहे.
3) एखादया विचाराचा त्याच्या विरोधी विचाराने प्रतिवाद करता येतो. तसा प्रतिवाद 'भाव' विषयी संभवत नाही.
4) 'भाव' क्षणिक असते. 'भाव' चा प्रवाह सारखा वाहत असतो तर विचाराला स्थिरता असते.

कॉलींगवूडच्या मते 'भाव' ला दोन बाजू असतात.

1) संवेदना

2) भावना

'भाव' विचारावर अवलंबून नसते 'भाव' ही विचाराच्या अधीची अनुभव अवस्था आहे. अनुभवाच्या या पातळीसाठी Physical Level Of Experience असा शब्दप्रयोग कॉलींगवूडने केलेला आहे.

संवेदनांचा अर्थ लक्ष देणे होय. विचार प्रक्रिया ही संवेदनांमध्ये संबंध प्रस्थापित करते. पण एखादी संवेदना इतर संवेदनांशी संबंध प्रस्थापित करते. पण हा संबंध प्रस्थापित करण्याआधी त्या संवेदनेचे स्वरप नीट जाणवे लागते. हे जाणणे म्हणजेच लक्ष देणे होय.

'भाव' च्या प्रवाहावर लक्ष दणे प्रकाश झोत टाकली की त्या प्रभावातल्या एक भागाला उठाव मिळतो. त्या उठाव मिळालेल्या भागांचे वैशिष्ट्य असे की स्पष्टपणे जाणून लक्ष देण्याच्या प्रक्रियेमुळे तो अधिक ठाशीवपणे आकलनक्षम बनतो. तिच्या गुणात किंवा तीव्रतेत बदल होत नाही. परंतु तिच्या अनुभवाच्या एकूण स्वरुपात बदल होतो. लक्ष दिल्याबरोबर जाणिवेच्या पातळीवरील अनुभव सुरु होतो.

या अनुभवात ज्ञाता व ज्ञेय वेगवेगळे झालेले असतात. आणि प्रत्येक अनुभवाच्या वेळी ज्ञात्याला अनुभव विषयाची जशी जाणीव होते तशी स्वतःचीही जाणीव होते. तसेच या पातळीवरील 'भाव' मानवांकीत झालेली असते. मानवांकित झालेल्या 'भाव' चे आयुष्य आपण वाढवू शकतो. बुध्दीच्या इतर प्रक्रीया तिच्यावर होऊ शकतात. जाणीवपूर्व 'भाव' व जिच्यावर बौध्दीक प्रक्रीया झाल्या आहे. अशी 'भाव' यांच्यामधली पातळी महत्वाची आहे. या पातळीवर लक्ष देण्याच्या क्रियेमुळे 'भाव' चे वैशिष्ट्ये आपल्याला कळतात. ती मानवांकित झालेली असते. व तिच्यावर बौध्दीक प्रक्रिया घडलेल्या नसतात. परंतु त्यासाठी ती सज्ज झालेली असते. या पातळीवरच्या अनुभवाला कल्पनात्मक पातळीवरचा अनुभव म्हणता येईल.

सर्व विचारांमध्ये सत्य-असत्यतेची द्विधृवात्मकता असते,असे आपण वर पाहिले आहे. जाणीवपूर्व अनुभवात ही द्विधृवात्मकता नसते. पण कल्पनात्मक पातळीवर ती असते. आपली 'भाव' भावना आपली आहे, असे स्वतःशी कबूल करण्यामुळे खरी जाणीव निर्माण होते तर ते नाकबूल करण्यामुळे खोटी जाणीव निर्माण होते.काही वेळा आपण एखादया 'भाव' कडे लक्ष दयायला सुरुवात करतो. तिच्यामध्ये काही भितीदायक आढळल्यामुळे आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. या प्रकाराला कॉलींगबूडने **'जाणीवेचे भ्रष्टीकरण '** असे नाव दिले आहे. जाणीवेचा उदय झाला की 'भाव' चे जिच्यात रुपांतर होते. तिला कॉलिंगवूड ***कल्पना*** किंवा *Idea* असे नाव देतो.

'भाव' मध्ये संवेदना / भावना हे दोन घटक असतात. असे कॉलींगवूडने सांगितले आहे. त्यामध्ये अविष्काराखेरीज शिवाय भावना असूच शकत नाही. प्रत्येक भावनेला तिला अनुरुप असा आविष्कार असावाच लागतो. अनुभवाच्या प्रत्येक पातळीवर त्याला अनुरुप अशी भावना व त्या भावनेला अनुरुप असा आविष्कार असतो. जाणिवेचा उदय होण्याच्या अगोदर केवळ 'भाव' च्या पातळीवर जो भावना अविष्कार होतो, तो फक्त शारिरिक असून त्यावर आपले नियंत्रण नसते. उदा. या पातळीवरील भीतीचा आविष्कार म्हणजे चेहरा पांढरा पडणे, फिकट पडणे. हा केवळ शारीरिक अविष्कार नसून तो भावनिक असतो आणि केवळ आपण नियंत्रित केलेला नसतो. जाणीवेचा उदय झाला की, निरनिराळ्या जातीच्या भावना निर्माण होतात. त्यांची जात म्हणजे वर्ग निराळा असतो. असे म्हणण्याचे कारण म्हणजे त्या 'स्व'('आत्म'च्या, आत्म्याच्या नव्हे)च्या जाणीवेवर आधारलेल्या असतात. द्वेष, प्रेम, लज्जा इ. भावना या जातीत मोडतात. त्यांना कॉलिंगवूड ***'जाणीवेच्या पातळीवरील भावना'*** असे नाव देतो. या भावना ही उचित आविष्कार होतो. केवळ 'भाव' च्या पातळीवरील आविष्कारात फरक असा की, पहिला संयमीत असतो तर दुसरा आपोआप निर्माण होतो. रागाने लाल होणे, हे खालच्या पातळीवरील असंयमित आविषकाराचे उदाहरण आहे. तीच भावना सौम्य शब्दात व्यक्त करणे हे वरच्या पातळीवरील आविष्काराचे उदाहरण आहे. येथे भाषा हा शब्द पुष्कळ व्यापक अर्थ वापरला आहे. कल्पनेच्या पातळीवरील भाव भाषेत व्यक्त केला की उचित भाषा आविष्कार करु शकेल, अशा कोणत्याही शारिरीक क्रियेला कॉलींगवूड भाषा नाव देतो.

लहान मूल भूकेमुळे रडते. त्याला स्वतःची जाणीव नसेल तर हे रडणे खालच्या पायरीवरील आविष्कार म्हणावा लागेल. पण मूल मोठे झाले म्हणजे ते भूक लागली हे दाखविण्यासाठी मुद्दाम रडत / ओरडते. रडण्याची क्रिया एकच, पण

पायरी बदलली की, तिचा अर्थ बदलतो. या वरच्या पायरीवरील रडण्या ओरडण्याला भाषा म्हणता येईल. आपण बोलतांना हावभाव करतो. चेहऱ्याच्या स्नायूंची हालचाल करतो. या सर्व क्रिया भाषेतच मोडतात. खरे म्हणजे आपण सर्व शरीरच आविष्कार करत असते.

कॉलींगवूडच्या मते, ***कल्पनेच्या पातळीवरील भावनांचा आविष्कार म्हणजे कला.*** या पातळीच्यावर आणखीही पातळ्या आहे. या वरच्या पातळींतील अनुभवांमध्ये कल्पना शक्तीने केलेले कार्य अंर्तभूत असल्यामुळे या वरच्या पातळ्यांवरील आविष्काराला देखील कला म्हणायला हवे. प्रत्येक शास्त्रीय ग्रंथ एक कलाकृती असते, असे क्रोचेचे मत आहे. कला म्हणजे आविष्कार आणि कल्पना, असे दोन सिध्दांत कॉलींगवूड मानलेले आहेत; असे जरी प्रथमतः वाटत असले तरी खरोखरी ते एकाच सिध्दांताचे दोन पैलू आहेत. कारण शेवटी कला म्हणजे कल्पनेच्या पातळीवरील भावनांचा अविष्कार आहे.



### कलेच्या वर्गीकरणाचे मार्ग : पृष्ठिय , साहित्यिक आणि ललित

**अ) पृष्ठिय कला :**

जी कला कलावस्तूच्या पृष्ठभागावर आरेखित करता येते ती,म्हणजे जी कला केवळ समोरून पाहता येते,जिला केवळ समोरचाच भाग आहे ती कलाहोय. चित्रकला, शिल्पकला किंवा प्लॅस्टिकच्या कलात्मक वस्तू .

**ब) साहित्यिक कला**

साहित्यिक कला म्हणजे वाङमय होय.काव्य, कथा, कादंबरी,नाटक, भाण, तमाशा इत्यादी.धर्म , जात, लिंग, प्रदेश,संस्कृती इत्यादी घटकांवर साहित्याची प्रतवारी ठरते. वाङमयाचे प्रकार,मूल्यमापन त्यावर ठरते.

**क) ललितकला**

ललितकला म्हणजे ज्याचें सादरीकरण करणे शक्य आहे अशा कला.नाटक, एकांकिका, तमाशा, काव्यसंध्या, नृत्य, वाद्य इत्यादी.भारतात भरताने ललितकला नाटकांसाठी आवश्यक सांगितली आहे.

### कलेचे प्रकार : संगीत, चित्रकला, शिल्पकला, नृत्य , साहित्य

**संगीत व नृत्य :**

या सादरीकरणाच्या कला असून वाद्यसंगीत,नाट्यसंगीत,भावसंगीत इत्यादी प्रकारांनी संगीत अभिव्यक्त होते तर भरताच्या मते नटाला संगीताची व नृत्याची जाण असणे आवश्यक आहे.नृत्य , संगीत ही प्रांत,कलाकार,आशय,संस्कृती इत्यादीनुसार भिन्न प्रकारची असते.या दोन्हींचा धर्म व धर्मसंस्थेशी निकटचा संबंध आहे. याचाच अर्थ दोन्हींना अध्यात्मिक व धार्मिक आधार असतो.प्रत्येक धर्माने धर्मप्रसारासाठी कला हे माध्यम वापरले.नृत्य व संगीत त्यात प्राधान्याने होतेच.संगीताचे माध्यम ध्वनी आहे आणि सितार वगैरे त्याचे साधन आहे.

**चित्रकला व शिल्पकला :**

या दोन पृष्ठिय कला असून या कलांवरही धर्म व तत्त्वज्ञानाचा मोठा प्रभाव आहे.सर्व धर्मात प्रेषित,देव,ईश्वर , देवदूत यांची चित्रे असतात.लिओनार्दो विंची हा धार्मिक व गूढवादी चित्रकार होता. भारतात एम.एफ.हुसेन हे असेच धार्मिक चित्रकार आहेत. चित्रकलेचे माध्यम रंग, रेषा आहे व साधन रंग, द्रव्य, अथवा पेन्सिल हे आहे. ज्या कलेचे माध्यम मुख्ततः रंग असून ब्रश,कागद इत्यादी साधनाच्या द्वारे ती मूर्त होते ती चित्रकला..शिल्प म्हणजे मुख्यतः दगड हे ज्याचे माध्यम आहे व जी छिन्नी ,हातोडी या साधनांच्या द्वारे आविष्कृत होते ती शिल्पकला होय.या दोन कलाप्रकारांच्या संमिश्रणातून आजची मूर्तिकला विकसित झाली आहे. आज कागदी मूर्ती, शिल्पे बनविता येतात.म्युरल पेंटिंग हा त्यातीलच एक प्रकार होय.

**साहित्य :**

वाङमय किंवा साहित्य हा कलेचा लिखित प्रकार होय. वाड्मयाचे माध्यम भावनात्मक आशय आहे तर साधन भाषा आहे.भावनात्मक आशय शब्दातून व्यक्त होत असल्याने या कलेचे मुख्य माध्यम शब्द बनते. काव्य,कथा,कादंबरी इत्यादी प्रकारात साहित्य निर्मिती होते.साहित्य निर्माण करतो तो साहित्यिक.लेखन कला अस्तित्वात नव्हती तेंव्हा पाठांतर हा साहित्याच्या रक्षणाचा व संवर्धनाचा एकमेव मार्ग होता.लेखन , मुद्रण कला आली तसे साहित्यकला जोमात आली.

या सर्व कलाप्रकारातील एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संगीत व नृत्य या कला व कलाकारात जणू अद्वैत असते.कलाकारापासून कला वेगळी होवू शकत नाही. इतर प्रकारात निर्माता व कला वेगवेगळी असतात.किंवा होतातच ! नृत्यसंगीतापासून वेगळे होवून नर्तक,संगीतकार आपली कला पेश करु शकत नाही.साहित्य साहित्यिकापासून वेगळे होते.म्हणूनच त्याचे समीक्षण शक्य होते.

### 4. कला आणि नैतिकता

कला, समाज आणि नैतिकता या संबंधात काही मुलभूत प्रश्न निर्माण होतात. काही वेळेस कलाकार कलावस्तू निर्माण करतो आणि समाजात वादंग, गोंधळ होतो. त्यामुळे साहजिकच कलेचा कला निर्मितिच्या काळातील राजकारण, समाज कारण व नैतिकतेच्या संकल्पना यांच्याशी संबध येतो. मग " चांगली कला म्हणजे काय ? " अशी नवीच समस्या उद्भवते. याबाबत दोन बाजू आहेत.

एका बाजूच्या मते, कला ही स्वायत्त असते व कलाकार कलावस्तू निर्मिती करण्यास स्वतंत्र असतो. 'कलेसाठी कला ' अशी ही  भूमिका असते. कलेचे रसग्रहण निरपेक्ष व स्वतंत्रपणे करता येते.  दुसऱ्या बाजूच्या मते कलाकाराचे असे स्वातंत्र्य नसते. त्याच्यावर समाजाचे बंधन असत, सामाजिक गरजा व नैतिक संकल्पना यांना अनुसरून त्याने कला निर्मिती करावी.' समाजासाठी कला' अशी ही भूमिका असते. यानुसार कलेचे रसग्रहण सामाजिक नियमानुसार होते. ही भूमिका विशेषतः मार्क्सवादाने मांडली. कला परायत्त (परावलंबी ) आहे, असे ते म्हणतात.

कला स्वायत्त आहे, याचा अर्थ ते जीवनातले सर्वात उच्च मूल्य आहे; असा नाही. त्याचा अर्थ इतकाच की, कला व्यवहार हा इतर लौकीक व्यवहारांपेक्षा मूलतः भिन्न आहे. याच्याबरोबर विरुध्द भूमिका घेणारे विचारवंत असे म्हणतात की, कलेला स्वतंत्र व स्वयंभू असे मूल्य नाही. जीवनातील इतर व्यवहारांमध्ये गोष्टींना जे मूल्य असते तेच मूल्य कमी अधिक प्रमाणात कलेला असते. कलानुभव आणि इतर अनुभव यांच्यातील फरक फार झाला तर संख्यात्मक आहे, गुणात्मक नाही काही वेळेस असा दावा करण्यात येतो की, कलेला केवळ साधन मूल्यंच असते.

मध्ययुगात धर्मप्रसारासाठी नाटयच नव्हे तर सर्वच कला राबविण्यात आल्या.पुढे जेव्हा ऐहिक मूल्यांना महत्व आले. तेव्हा नीती, राजकारण, राष्ट्रभक्ती इ. गोष्टी साठी कलांचा उपयोग करण्यात येऊ लागला.शिक्षण व मनोरंजन यांना कलेले विविध ध्येय मानल्यापासून आजपर्यंत अनेक सौंदर्यशास्त्रज्ञांनी व टीकाकरांनी व कलावंतांनी या कल्पनेचा कमी अधिक प्रमाणात पाठ पुरावा केल्याचे दिसते.  कलेला केवळ साधन मूल्य आहे असे मानणारे लोक बहुदा असे म्हणतात की, कला हे या विविध शिक्षणाचे साधन आहे. कलेचे दूरगामी परीणाम लक्षात घेतले की, कलेचा नितीशी संबंध कसा येतो, कळते. म्हणूनच कलेच्या भावनात्मकतेचा विचार करतांना नीतिविचारांचा सौंदर्यशास्त्रात प्रवेश होतो.

नीती व नैतिक या शब्दांना पुष्कळदा फार संकुचित अर्थ दिला जातो. उदा. स्त्री पुरुषांमधील संबंध, लाचलुचपत, व्यसने यांच्याबद्दलच्या प्रश्नांनाच नैतिक प्रश्न म्हणण्यात येते पण या गोष्टी इतकेच महत्व असण्याऱ्या जीवनातील इतर गोष्टींना नैतिकतेच्या कक्षेत स्थान दिले जात नाही. उदा. एखादया शिक्षकाने मन लावून शिकविले नाही अथवा वाहतुकीचे नियम पाळले नाही, ते कृत्य अनैतिक समजले जात नाही.  नैतिकतेला असा संकुचित अर्थ देणे बरोबर नाही. ***आपण करीत असलेली गोष्ट आपले कर्तव्य आहे,*** हे जेव्हा आपल्या बुध्दीला पटेल जेव्हा ती गोष्ट करणे किंवा न करणे याला नैतिक अर्थ प्राप्त होतो. आपण जे  नीतीनियम मानतो त्यांच्याविषयी जेव्हा आपण विचार करु लागतो तेव्हा असे ध्यानात येते की, ''चांगले, श्रेयस्कर व आदर्श मानवी जीवन कसे असावे ?'' याचे चित्रण या नियमांमागे असती. हे आदर्श जीवन प्राप्त व्हावे म्हणून नैतिक नियमांचे पालन करावे लागते. याचा अर्थ असा नव्हे की हे सर्व नियम साधनेच आहेत. त्यातले काही साध्यही आहेत. उदा. शेजाऱ्यावर प्रेम करावे,असे जे खिस्ताने सांगितले आहे ते आदर्श मानवी जीवनाचा भाग आहे. आदर्श जीवन प्राप्त करुन घेण्याचे ते साधन नव्हे. कला आणि नीती यांच्यातील संबंध म्हणजे कला पुरुषार्थ किंवा जीवनमूल्य यांच्यातील संबंध .

कलेसाठी कला की जीवनासाठी कला ? हा एकेकाळी महाराष्ट्रात व देशातच गाजलेला वाद आहे. कलेसाठी कला हा शुध्द आविष्कारवादी सिध्दान्त असून तो केवळ कलेला महत्व देणार आहे. मार्क्सवादी म्हणतात  त्याप्रमाणे

कलेचा मानवी जीवनासाठी उपयोग करता कामा नये. कला ही केवळ जीवनासाठी असते.कलेसाठी कला असा आग्रह धरणारे ते ***कलावादी*** होत.कलावाद हा चेतनावादावर आधारलेला आहे. विश्वाचे अंतिम सत्व असलेले सत्य चैतन्यमय आहे आणि कलेमार्फत ते प्रगट होते.सत्यम, शिवम् सुंदरम ही त्यांची त्रिसुत्री असते.कला केवळ सुंदरतेशी नव्हे तर नैतिकतेशीही निगडीत आहे , असे ते म्हणतात.कला सत्याचा आविष्कार आहे, असा ही त्यांचा दावा असतो ,कलाकार हा साधकच असतो.

कला ही जीवनासाठी असली तरी जीवनदर्शन तिने घडवावे असे मत कलावादी करीत नाहीत.त्यांच्या मते कलानिर्मिती ही कला निर्माण करावयाची आहे, या हेतूसाठीच झाली पाहिजे. तिच्या मागे प्रचार, प्रसार, पैसा, प्रसिध्दी इत्यादी भौतिक हेतू असता कामा नये.कलावाद्यांनी सर्व कलाप्रकारांकडे याच नजरेने पाहिले.प्रत्येक कलेला आपसूकच स्वतःचा हेतू,माध्यम, साधने असतात.त्याचरितीने ती व्यक्त होते.कला ही सौंदर्य व्यक्त करण्याचा एकमेव मार्ग आहे. कलानुभव हा सौंदर्यानुभव असतो. कलावाद मार्क्सवाद विरोधी आहे. मार्क्सवादानुसार कला ही कधीही स्वतःसाठी असू शकत नाही.कलेचे उदिदष्ट नेहमी समाजोपयोगीच असले पाहिजे कलेसाठी कला ही भूमिका तात्त्विक अर्थाने टॉलस्टॉयने तर समाजासाठी कला ही भूमिका प्राचीन काळी प्लेटोने मांडली.

## टॉलस्टॉय : कलेसाठी कला – स्वायत्त कला

टॉलस्टॉयच्या मते कला हा मानवी अनुभवाच्या देवाणघेवाणीचा एक मार्ग आहे. शब्दांच्या द्वारा विचार एकाकडून दुसऱ्याकडे संक्रमीत होतात त्याचप्रमाणे कलेच्या द्वारा भावना संक्रमीत होता. कला हे भावना संक्रमणाचे एक माध्यम असल्यामुळे विविध माणसांना एकत्र आणण्याचे प्रशंसनीय कार्य तिच्याकडुन घडते.

कलेतील आशय कसा असावा ? याविषयी विवेचन करतांना टॉलस्टॉय म्हणतो की, मानवाला पूर्णत्वाला नेण्याचे कला हे एक साधन आहे. कलेतील आशयाची गुणवत्ता तो आशय मानवी प्रगतीला कितपत हातभार लावतो यावर अवलंबून आहे. टॉलस्टॉय म्हणतो की, भावनांची दृष्टता व सृष्टता ठरविण्याला एकमेव मार्ग म्हणजे धार्मिक दृष्टिकोनातून त्यांचे मूल्यमापन करणे हा होय.

जीवनाचा अर्थ काय ? या विषयी प्रत्येक समाजाची एक विशिष्ट कल्पना असते. ही कल्पना म्हणजे त्या समाजाचा सर्वोच्च पुरुषार्थ होय. जीवनातील गोष्टींचे मूल्यमापन अखेरीस या सर्वाच्च मुल्यांच्यादृष्टिनेच होत असते. या दृष्टिकोनालाच टॉलस्टॉय धार्मिक दृष्टिकोन म्हणतात. टॉलस्टॉय च्या मते प्रत्येक कलाकृती पुढील प्रश्न विचारायला हवे.

1) ती कलाकृती अस्सल आहे की नकली तिच्यामुळे भवनांचे संक्रमण होते की नाही ? भावना संक्रमण होत नसेल तर ती कलाकृती नकली ठरेल.
2) एखादया कलाकृतीमुळे भावना संक्रमण होते. असे ठरले तर या संक्रमणाची व्याप्ती किती हे विचारले पाहिजे वाईट कला एखादया लहान गटांच्या भावनांचा अविष्कार करीत असल्यास तिच्यामुळे होणाऱ्या भावना संक्रमणाची व्याप्ती फार लहान असणार हे उघड आहे. चांगल्या कलेची व्याप्ती खूपच विशेष असते. ती यांनतर असे विचारले पाहिजे की, चांगली कला कोणत्या प्रकारच्या भवनांचे संक्रमण करते. टॉलस्टॉय ने केलेल्या वर्गीकरणाप्रमाणे सार्वत्रिक बंधुभावाला पोषक असलेली कला सर्वोच्च ठरते.

टॉलस्टॉयच्या मते कलेचा कला म्हणून जरी विचार केला तरी नीतीगुणांचा परिपोष, नीतीमूल्यता हाच तिचा अखेरचा निकष आहे. भावना संक्रमण क्षमतेला तो कलेचा निकष मानतो हे खरे पण पुढे चांगली कला व वाईट कला असा भेद करुन टॉलस्टाय म्हणतो की, बंधुभाव वाढवणारी कलांच चांगली असते. वाईट कला बंधुभावाच्या विरोधी भावना उत्पन्न करते. पण त्याचय मुळेच तिच्या भावना संक्रमण क्षमतेवर बंधन पडतात. एखादया विविष्ट गटापलीकडे ती कळ नाही. याचा अर्थ असा की, भावना संक्रमण क्षमता जरी कलेचा निकष असला तरी भावनांच्या जातीवर ही संक्रमण क्ष्ज्ञमता अवलंबून असते. म्हणून खऱ्या अर्थाने सदभावनांचे संक्रमण हा नुसत्याच चांगल्या कलेचा नव्हे तर सर्व कलेचा निकष ठरतो.

## प्लेटो : समाजासाठी कला – परायत्त कला

प्लेटो कलेला नैतिक निकष लावतो हे खरे आहे. पण नैतिकता हाच कलेचा एकमेव निकष आहे. असे तो मानत नाही. प्लेटोचे कलेवर विशेषतः काव्यावर फार प्रेम होते. त्याच्या स्वतःच्या तात्वीक विधानात वांडमयीन गुण व साहित्यिक गुण आढळतात. असे टीकाकारांचे मत आहे. प्लेटोचे सौंदर्याबद्दलचे विवेचन व कलाविषयीचे विवेचन यांत फरक आहे.

आपल्या **फिडरस** या संवादामध्ये प्लेटोने सौंदर्याचा गौरव केलेला आहे. जगातील सर्व गोष्टींच्या मूळाशी त्याची सत्वे असतात. सुंदर गोष्टींच्या मुाशी सत्वे असते. सौंदर्य म्हणजे इंद्रियांना जग केवळ मनसचक्षूंना दिसणारे सत्वांचे जग यांना जोडणारा दुवा आहे. असे ठरते. असे असल्यामुळे सौंदर्य हे माणसांच्या आत्मीक उन्नतीचे एक महत्वाचे साधन होर्ठल असे म्हणता येईल. कलेमध्ये सौंदर्य असल्यामुळे तीच्यामुळेही आत्मीक उन्नती होईल ही अपेक्षा आपल्या मनात साहजीकच निर्माण होते. परंतू वाडमंय कलांमुळे आत्मउन्नती होण्याऐवजी सदगुणांचा भास होते असे प्लेटोला आढळून आले. म्हणून त्याने कलांना हद्दपार करतांना त्याला दुःखही झाले.



एक मुद्दा येथे होतो की, कलेबद्दल बोलतांना प्लेटो टॉलस्टॉय प्रमाणे केवळ एकेरी निकष वापरत नव्हता तसेच सौंदर्य व नीती यांच्यात संघर्ष निर्माण झाल्यास प्लेटो नीतीची बाजू घेतो.

प्लेटोने सर्वच कलाकृतीचा धिक्कार केलेला नसून फक्त हलक्या प्रतीच्या बाजारु कलाकृतींचा धिक्कार केलेला आहे. त्याच्या **'रिपब्लीक** ' या पुस्तकात तो असे दाखविता की, आदर्श राज्यात व राज्यातील नागरीकांत 4 सदगुण असणे आवश्यक आहे. हे सदगुण म्हणजे विवेक किंवा ज्ञान, शौर्य, संयम व न्याय हे होय. ज्ञान, शौर्य व संयम यांच्यात सुसंगती प्रस्थापित झाल की न्याय निर्माण होतो. ज्या प्रमाणात कला या सदगुणांचा परीकोष करते. त्या प्रमाणात ती चांगली ठरते. जी कला त्याला कमजोर करते ती वाईट असून तिला आदर्श राज्यातून हद्दपार केले पाहिजे असे प्लेटोचे म्हणणे आहे.

सिडनीच्या मते आत्मोन्नती हे सर्व ज्ञानाचे ध्येय आहे. काव्याचेही ध्येय तेच आहे. हे ध्येय गाठण्यासाठी जे मार्ग उपलब्ध आहे. त्यापैकी काव्याचा मार्ग सर्वश्रेष्ठ आहे. इतिहासकार व तत्वज्ञ यांच्याशी कवींची तुलना केल्यास हा मुद्दा स्पष्ट होईल. तत्वज्ञ अमूर्त शब्दांमध्ये नितीपाठ देतो तर इतिहासकार विविध ऐतिहासिक व्यक्तींची व घटनांची उदाहरणे यांना एकत्र आणणे जमत नाही. आणि त्यामुळे नैतिक शिक्षणाच्या कार्यात दोघेही कमी पडतात. तत्वज्ञाचा नितीपाठ इतका अमूर्त असतो की तो ज्याला समजला व आपल्या जीवनात आचरणात आला तो माणूस धन्य म्हणायला हवा. इतिहासकार जी उदा. देतो त्यावरुन जग कसे आहे हे कळते. पण ते कसे असावे हे मात्र कळू शकत नाही. कवी या दोघांपेक्षा श्रेष्ठ आहे. कारण तो अमूर्त संकल्पना व विशिष्टय उदा. यांची सांगड घालतो. तत्वज्ञ जो शिवितो ते लोकांना कळत नाही. पण तेच नितीतत्व कतीने सांगितले की तर सर्वांना कळते. इतिहासकारांनी दिलेल्या उदापेक्षा कतीने दिलेली उदा. जास्त परीणामकारक ठरतात. कारण त्यांच्याजवळ खऱ्या व काल्पनिक उदाहरणांचा मोठा साठा असतो. आणि दुसरे असे की सदगुणांचा विजय झाल्याचे व दुर्गुणांचा पराजय झाल्याचे तो दाखवू शकतो.